महावितरण

# जाहीर सूचना

आय.टी.आय. विजतंत्री (Electrician) ट्रेड २९ पदे, तारतंत्री (Wireman) ट्रेड ३१ पदे व संगणक चालक (COPA) ट्रेड २० पदे, NCVT उत्तीर्ण झालेल्या (१०+२ या बंधामधील) उमेदवारांकडून शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी (Apprentice-ship) एकूण ८० पदाकरीता म.रा.वि.वि.कं. मर्या. सं व सु मंडळ उस्मानाबाद करीता (उस्मानाबाद व तुळजापूर विभाग) दि. २४.०२.२०२० ते २६.०२.२०२० या कालावधीमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

**टीप :** १) वरील कालावधीत सकाळी ११.०० ते दु. ०४.०० या वेळेत सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह (इयत्ता १० वी चे गुणपत्रक व सनद, आय.टी.आय. गुणपत्रक व सनद, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड, Apprentice Registration प्रत, व पासपोर्ट साईज फोटो सह) प्रत्यक्ष मंडळ कार्यालय उस्मानाबाद येथे सादर करावेत. २) उमेदवाराचे Apprentice Portal वर ऑनलाईन रजिस्ट्रेशन असणे अनिवार्य आहे. ३) उमेदवाराची निवड आय.टी.आय. च्या ०४ सत्राच्या (Semester) सरासरीनुसार (Average) मिळालेल्या एकूण गुणानुसार तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्रं.५८१ए/१६-ब दि. ०४.०७.२०१९ प्रमाणे असलेल्या आरक्षणानुसार करण्यात येईल. ४) भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकारास राहतील. ५) उमेदवाराने लोकप्रतिनिधी अथवा राजकीय व्यक्तिकडून दबाव आणल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारास राहतील. ६) निवड झालेल्या उमेदवारांची यादी दि. ०६.०३.२०२० रोजी मंडळ कार्यालय उस्मानाबाद येथील नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांनी मूळ कागदपत्र छाननी करीता दि. १२.०३.२०२० व १३.०३.२०२० रोजी महावितरण मंडळ कार्यालय उस्मानाबाद येथे सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत मूळ कागदपत्रासह हजर रहावे. सदर दिवशी उमेदवार हजर न राहिल्यास अशा उमेदवाराचा प्रशिक्षणार्थी भरतीकरीता विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. ७) सदर भरती प्रक्रियेकरीता उस्मानाबाद येथे येण्यासाठी अथवा परत जाण्यासाठी कोणताही प्रवास व दैनिक भत्ता मिळणार नाही. ८) इच्छुक उमेदवारांनी सर्व कागदपत्रासह म.रा.वि.वि. कं. मंडळ कार्यालय उस्मानाबाद येथे संपर्क साधावा, दूरध्वनीद्वारे संपर्क करू नये. ९) सदर प्रक्रिया ही उस्मानाबाद जिल्ह्यातील उमेदवारांसाठी मर्यादित आहे.

**Ref : PRO Latur No - LZ/256/2019-20**

**अधीक्षक अभियंता मंडळ कार्यालय उस्मानाबाद**